विशेष दिवाणी दावा क्र.३८/२०१७

<u>आदेश निशाणी क्र.६५ वर</u>

1. वादी क्र. २ ने सदरचा अर्ज त्यांचा 'पुरावा रद्द' केला असा झालेला आदेश रद्द होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

2. वादीचे क्र. २ चे म्हणणे असे की, त्याने पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. परंतु कोविड-१९ महामारी रोगाची साथ असल्याने वादी क्र.२ हे न्यायालयात हजर राहून उलटतपास देवू शकले नाहीत. वादी क्र.२ चे विरोधात केलेला आदेश रद्द न केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे असे अपरिमित नुकसान होणार आहे. सदरील आदेश रद्द केलेस गुणागुणांवर निकाल देण्यास मदत होणार आहे. सबब, सदरचा अर्ज.

3. प्रतिवादी क्र. ५ व ६ यांनी सदर अर्जास म्हणणे देवून तीव्र आक्षेप घेतलेला आहे. वादीचा अर्ज बनावट असून प्रतिवादींना मान्य व कबुल नाही अर्ज रद्द करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

4. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. वादी हे मागील काही तारखांपासून वारंवार गैरहजर आहेत. वादी क्र.२ यांना पुकारले असता गैरहजर होते. त्यामुळे त्यांच्या प्रतिज्ञापत्र वर 'वाचता येणार नाही' चा दि.२२/०२/२०२० रोजी आदेश पारीत झालेला आहे. आज रोजी वादी हजर आहेत. कोविड-१९ रोगाचा प्रादूर्भाव मोठया प्रमाणात वाढल्यामुळे वादी न्यायालयात हजर राहू शकले नाहीत असे सांगितले आहे. सदर कालाधीत कोविड-१९ चा प्रादुर्भाव नसला तरीही वादी क्र. २ यांचा पूरावा अभिलेखावर घेण्याची संधी न दिल्यास त्यांचे नुकसान होणार आहे. परंतु झालेला विलंब लक्षात घेता रक्कम रु.५००/- दंडासह अर्ज मंजूर करणे न्यायाचे दृष्टीने योग्य होईल. त्यामुळे, पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

<u>आ दे श</u>

१. अर्ज रक्कम रु. ५००/- खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी क्र. २ यांच्या विरुध्द 'पुरावा वाचता येणार नाही ' असा झालेला आदेश रद्द करुन त्यांना पुरावा दाखल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सही/-

दि. २४/०३/२०२१

( अर्चना श्रीपत नलगे )

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, पंढरपूर.

# C E R T I F I C A T E

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment.

| | |
|---|---|
| a Name of the Stenographer | : Shirsikar V.G. |
| b Court | : 2nd Jt. Civil Judge S.D.Pandharpur |
| c Date of Judgment | : 24/03/2021 |
| d Judgment signed by P.O. On | : 24/03/2021 |
| e Judgment uploaded on | : 24/03/2021 |